# प्रसिध्दी पत्रक

दि. १५/०५/२०२४

कृषी विभागातील कृषी आयुक्तालयाच्या व अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्न श्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी ) या पदांची ऑनलाईन परीक्षा दि.२१ सप्टेंबर, २०२३ रोजी झाली असून त्याबाबतचा निकाल आयुक्तालयास प्राप्त झालेला आहे. सदरचा निकाल कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला असून सदर पदांसाठी अंतिम गुणवत्ता यादी/अंतिम प्रतिक्षा यादी तयार करताना लेखी परीक्षेमध्ये किमान ४५% गुण मिळवून पात्र ठरलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेणे क्रमप्राप्त आहे.

उमेदवारांकडून सदर परीक्षेसंदर्भात सतत होत असणारी विचारणा लक्षात घेता, याबाबत कळविण्यात येते की, सदर परीक्षेचे नियोजन सुरु आहे आणि सदरची व्यावसायिक चाचणी परीक्षा जी संस्था घेणार आहे, त्या संस्थेशी कृषी आयुक्तालयामार्फत झालेली चर्चा व पत्रव्यवहार च्या अनुषंगाने या प्रसिद्धी पत्रकाद्वारे पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, सदरची व्यावसायिक चाचणी ही जुलै/ऑगस्ट - २०२४ दरम्यान घेण्याचे नियोजन असल्याचे संबंधित संस्थेने कळविले आहे. तसेच पात्र उमेदवारांना असेही कळविण्यात येते की, सदरची व्यावसायिक चाचणी ही मराठी/इंग्रजी या दोन्ही भाषांपैकी कोणत्याही एकाच भाषेमध्ये देणे आवश्यक राहील, याबाबतचा आवश्यक तपशील भरणेबाबतची आवेदन पत्राची लिंक खुली करण्यात येणार आहे. सदरची लिंक यथावकाश कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११८/भाषा-२, दि.१७.१०.२०२२ अन्वये लघुलेखन, उच्चश्रेणी लघुलेखन, निम्नश्रेणी लघुलेखन किंवा लघुटंकलेखन या पदावर नेमलेल्या व इंग्रजी लघुलेखनाचे काम करणाऱ्या प्रत्येक लघुलेखकाला किंवा प्रत्येक टंकलेखकाला शासकीय सेवेत रूजू झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या कालावधीत एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ८० शब्द गतीची मराठी लघुलेखनाची व प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल, ही बाब देखील या प्रसिद्धी पत्रकाद्वारे पात्र उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

मा.आयुक्त कृषी यांचे मान्यतेने.

(गजानन पाटील)
वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५